**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०५**

**सभावृत्तांत**

दिनांक – ०५/०९/२०१९ वेळ – दुपारी – २.३० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०५/०९/२०१९ रोजी दुपारी २.३० वा. ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांची नावे | |
|---|---|---|
| १ | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा.बनसोडे राजू वि श्वनाथ | सदस्य |
| ३ | मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| ४ | मा.राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| ५ | मा.चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| ६ | मा. कणसे संजय गुलाब | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय मा.संदीप खोत - क्षेत्रीय अधिकारी, श्री.कोळप एस.डी. प्रशासन अधिकारी, -श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, श्री.रामेश्वर मोहाडीकर - उपअभियंता जलनि:सारण विभाग, श्रीम.मोमीन झेड.आय.- उपअभियंता, श्री.मोहन खोंद्रे – उपअभियंता-झो.नि. पू., श्री.मोरे चंद्रकांत – प्र.उपअभियंता (उद्यान स्था.), श्रीम.एस.एस.कुलकर्णी , क.अभियंता, श्री.दांगडे सुनिल ज्ञानदेव – क.अ.स्थापत्य श्रीम.सी.ए.मोरे – प्र.उपअभियंता(स्था.उ.), श्री.संदीप जीवन लोहकरे – क.अ.जलनि:सारण, श्री. समीर दळवी – क.अभियंता –विद्युत, श्री.के.एस.अंदुरे – क.अभियंता, श्रीम.प्रीती यादव – क.अभियंता- जलनि:सारण, श्री.कोतकर पी.बी. क.अ.झोनिपू स्थापत्य, , , श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता, श्री.महेंद्र के.देवरे – क.अभियंता (स्था), श्री.सानप एस.एस.-क.अभियंता, श्री.एस.ए.बगली- क.अभियंता, श्री.प्रमोद बांदल –तारतंत्री (वि), श्री.डी.एस.सासवडकर- सहा.आरोग्याधिकारी, श्री. एस.बी.लांडगे – उद्यान सहाय्यक, श्री.जे.व्ही.पटेल-सहा.उद्यान अधिक्षक, श्री.आर.जी.शिरसाट – उद्यान सहाय्यक (उद्यान) श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.संजय बबनराव मानमोडे – आरोग्य निरीक्षक, ,श्रीम.रश्मी तुंडलवार – आ.नि., श्री.एस.एच.चौहान – आरोग्य निरीक्षक आरोग्य, उध्दव डवरी –आ.नि. कचरावाहतुक,

------------

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

-----------

खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली.

सुचक – मा.संजय कणसे अनुमोदक – मा.राजू बनसोडे

**मा.कणसे संजय गुलाब – नामनिर्देशित सदस्य** – आपल्या देशाचे माजी अर्थमंत्री मा अरुणजी जेठली यांचे पंधरा दिवसापुर्वी दु:खद निधन झाले असल्याने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी त्यांना दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

(सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.)

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा. सभापती** : आज दिनांक ०५/०९/२०१९ रोजीची मासिक सभा दिनांक ०९/०९/२०१९ पर्यंत तहकूब करण्यात येत.

सही/-
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०५**

**सभावृत्तांत**

**दिनांक ०५/०९/२०१९ची तहकूब सभा**

दिनांक – ०९/०९/२०१९ वेळ – दुपारी – २.३० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह् प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०५/०९/२०१९ रोजी दुपारी २.३० वा.ची तहकूब सभा दिनांक ०९/०९/२०१९ रोजी दुपारी २.३० वा. ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांची नावे | |
|---|---|---|
| १ | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा.शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| ३ | मा.सुजाता सुनिल पालांडे | सदस्या |
| ४ | मा.आशा धायगुडे – शेंडगे | सदस्या |
| ५ | मा.उषा उर्फमाई मनोहर ढोरे | सदस्या |
| ६ | मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | स्विकृत सदस्य |
| ७ | मा.कणसे संजय गुलाब | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय मा.संदीप खोत- क्षेत्रीय अधिकारी, श्री.कोळप एस.डी. प्रशासन अधिकारी, श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, श्री.रामेश्वर मोहाडीकर - उपअभियंता जलनि:सारण विभाग, श्रीम.मोमीन झेड.आय.- उपअभियंता, श्री.मोहन खोंद्रे – उपअभियंता-झो.नि. पू., श्री.विजयसिंह भोसले – उपअभियंता, श्री.दिलीप धुमाळ – उपअभियंता, (वि), श्री.मोरे चंद्रकांत – प्र.उपअभियंता (उद्यान स्था.), श्रीम.एस.एस.कुलकर्णी , प्र.उपअभियंता, श्रीम.ए.ए.मोरे – क.अभियंता(स्था.उ.), श्री.संदीप जीवन लोहकरे – क.अ.जलनि:सारण, श्री.जिंतीकर आर.एन. - क.अ.जलनि:सारण, श्री.के.एस.अंदुरे – क.अभियंता, श्रीम.प्रीती यादव – क.अभियंता- जलनि:सारण, , श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता, श्री.महेंद्र के.देवरे – क.अभियंता (स्था), श्री, श्री.शामसुंदर बनसोडे – क.अभियंता (विद्युत), श्री.दाढे ए.जी.क.अ. बीआरटीएस, श्री.कोतकर पी.बी. –. क.अ.झोनिपू, श्री.एस.ए.बगली- क.अभियंता, श्री.प्रमोद बांदल – तारतंत्री, श्री.डी.एस.सासवडकर- सहा.आरोग्याधिकारी, , श्री.जे.व्ही.पटेल-सहा.उद्यान अधिक्षक, श्री.आर.जी.शिरसाट – उद्यान सहाय्यक (उद्यान) श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.संजय बबनराव मानमोडे – आरोग्य निरीक्षक, ,श्रीम.रश्मी तुंडलवार – आ.नि., श्री.उध्दव डवरी –आ.नि. कचरावाहतुक, सौ.जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक,

------------

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत सभेस सुरुवात करणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे सप्टेंबर २०१९ च्या दिनांक ०५/०९/२०१९ रोजीची तहकूब सभा दिनांक ९/९/२०१९ रोजी मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव**, सभाशाखा : मागील सभा कार्यपत्रिका क्र.०५ माहे सप्टेंबर २०१९ चा सभावृत्तांत कायम करण्यात मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : माहे सप्टेंबर २०१९ कार्यपत्रिका क्र. ०५ चा सभावृत्तांत कायम करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव - सभाशाखा** :सन्मा. सदस्य यांनी सुचविलेल्य प्रभाग कामकाजाबाबत चर्चा करणेस मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : सन्मा. सदस्य यांनी प्रभाग कामकाजाबाबत काही सुचना असतील त्या करणेस मान्यता देणेत येत आहे. तदनंतर माहे सप्टेंबर २०१९ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

--------

**मा.शाम लांडे –** सध्या सणासुदीचे दिवस आहेत त्यामुळे स्वच्छतेच्या बाबत हयगय करु नये. आमच्या सर्वांच्या मान्यतेने सर्व काम पुर्ण करणे. झोपडपट्टीत राहणारे लोक आपले आहेत. त्यामुळे त्यांचेकडील सर्व स्वच्छतेची काम पुर्ण करावी. सणासुदीचे दिवसामध्ये दसरा, दिवाळीपुर्वीच सर्व स्वच्छतेची कामे पुर्ण करावीत.

**मा.आशा शेंडगे –** पाणी पुरवठा काही ठिकाणी बंद होता. पाणी पुरवठा करणेबाबत वेळेत बदल केला तर सर्वांना त्याची कल्पना देण्यात यावी. चारही प्रभागामध्ये पाणीपुरवठा करणेबाबतची वेळ निश्चीत केले आहे ते सांगण्यात यावे. सगळीकडे पाणीपुरवठयाबाबत समस्या निर्माण झाली आहे. त्याबाबत योग्य निर्णय घ्यावा.

**श्रीम.कुलकणी- क.अभियंता पाणीपुरवठा -** श्री.पाटील एस.डी.उपअभियंता यांचेकडील चार्ज सध्या माझ्याकडे आहे. पुढच्या वेळेस पाणीपुरवठा करणेसंदर्भात काही अडचणी असेल तर फोन करण्यात येईल. ट्रॅव्हलची गाडी वॉलवर उभी असल्यामुळे पाणीपुरवठा करता आला नाही.

**मा.सभापती –** मला तो वॉल माहित आहे. तो वॉल जोडून पॅक करा. वॉल मी स्वत: दाखवला आहे.

**मा.आशा शेंडगे –** शास्त्रीनगर भागात पाणीपुरवठा कमी दाबाने होत आहे. ज्या ठिकाणी बैठी घरे आहेत त्यांच्या ब-याच कंप्लेंट आहेत.

**मा.सभापती -** सगळीकडील पाणीपुरवठा बाबत अडचणी आहेत. यापुर्वी पाणीपुरवठा विभागातील अधिका-यांना सांगितले आहे. त्यांचेसोबत मिटींग घेतली आहे. त्यांना भेटल्यावर आपले प्रभागातील पाणीपुरवठयाबाबतचे काम करतील.

**मा.सुजाता पालांडे -** माझेकडील पुर्ण वॉल विस्कळीत झाला आहे. त्यामुळे वॉर्डमध्ये पाण्याबाबत गोंधळ झाला आहे. माझे वॉर्डमधील वॉल का काढला आहे. दुस-या सोसायटीचे पाणी घ्यायचे नाही. मला हा वॉल काढून दुसरा वॉल बसवून पाहिजे. तो टेक्नीकल प्रॉब्लेम आहे. पहिल्या मजल्यावर पाणी येत नाही. नवीन वॉल लावला पाहिजे. माझे वॉर्डमधील पाणी कोणाला दयायचे नाही. मला तेथील वॉल काढायचे काम लवकरात लवकर करुन दयावे. येथील वॉल काढून तेथे नवीन वॉल बसविला पाहिजे.

**मा.आशा शेंडगे –** माझे वॉर्डमधील स्ट्रीट लाईट नेहमी जातात. लाइन प्रॉब्लेम असल्यामुळे वारंवार लाईट जातात. चांगले कार्यक्षम टिकुन राहील अशा प्रकारचे लाईटचे काम करावे. कर्मचा-यांनी कुठे लाईट बंद आहे का नाही हे पाहिले पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे –** विद्युत विभागातील कर्मचा-यांना फोन केला तर ते फोन उचलत नाही. व ते कर्मचारी कामही करीत नाही.

**श्री.दिलीप धुमाळ – उपअभियंता, (विद्युत)-** विद्युत विभागाकडील वायरमन रिटायर्ड झाले आहेत.

**मा.सभापती –** चार महिने झाले वायरमन रिटायर्ड झाला आहे. सध्या जे कर्मचारी आहेत त्यांनी कामे करायची आहे. मला काहीही सांगायचे नाही. कामे वेळेवर व्यवस्थित झाली पाहिजे.

**मा.आशा शेंडगे –** प्रत्येक विभागात काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांनी कामे करायची आहेत. माझे वॉर्डमधील गार्डनमध्ये कायम लाईट जात असते. ती लाईट चेक करणे. ती लाईट जर बंद असेल तर ती चालू करणे. महिना महिना लाईट जाते तर ती लाईट चालू करत नाही.

**श्री.दिलीप धुमाळ – उपअभियंता, (विद्युत) -** या ठिकाणी नेहमी लाईट का जाते याबाबत पाहणी करतो. गार्डनमधील लाईटचे काम करुन घेतो.

**मा.सुजाता पालांडे –** गेल पाच महिन्यापासून माझे वॉर्डमध्ये काहीच काम करीत नाही. माझे वॉर्डधील कर्मचारी बदलण्यात यावे.

**मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे-** माझे वॉर्डमध्ये गार्डनच्या बाजूला डुकरे आहेत. त्या डुकरांना नेणे आवश्यक आहे. काही दिवसांनी परत डुकरे पकडण्याची योजना राबवावी. मागच्या मिटींगला याबाबत मी बोलले होते.

व नेहमीच बोलत असते. दोन नदयांचे पाणी वाहत असते. तिथे लोक काम करतात. कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर काम चालू केलेले आहे. कार्यकर्ते टेंडरचे मालक झालेले आहेत ही मूळ अडचण आहे. हे जे काही टेंडर आहे ते आरोग्य विभागाने खास करुन म.न.पा.ने ताबा घेतला पाहिजे. एक झाडूवाली साधारण किती मीटर झाडू मारण्याचे काम करतात.

**मा.सभापती –** पुणे महापालिकेत एक झाडूवाली ४०० मीटर झाडू मारते. व आपलेकडे एक झाडूवाली ६०० मीटर झाडू मारते.

**मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे –** आपलेकडील झाडूवाली ४०० मीटर ऐवजी ६०० मीटर झाडू मारते. कॉन्ट्रॅक्टर कामावर २० माणसे दाखवतो व प्रत्यक्ष १० लोक कामकाज करीत असतात. पगारसुध्दा वेळेवर देत नाही. आरोग्य विभाग सिरीयस का घेत नाही. अध्यक्ष, महापौर यांचेसमोर विषय मांडला पाहिजे. पावसाळयाचे दिवसात स्पेअर कर्मचारी असणे गरजेचे असते. त्यावेळी त्या कर्मचा-यांना झाडू मारण्याचे जास्त काम देऊ नका. कामकाज कोणी किती करायचे याबाबत नियोजन करावे. पुराचे ठिकाणी कामकाज करताना तात्पुरते बंधन असावे. त्यामुळे कामकाजावर लोड येत नाही.

सगळीकडे केरकचरा जमा होतो.कचराकुंडयातील कचरा बाहेर पडतो. याबाबत शिस्त नाही. कच-यामुळे सगळीकडे दुर्गंधी वाढली आहे. मेनरोडला सर्व विद्रुपीकरण दिसते. या गोष्टीला कुठे तरी लगाम लागला पाहिजे.

सध्या सणासुदीचे दिवस आहेत सगळीकडे पाणीपुरवठा व्यवस्थित करणे. काही ठिकाणी पाणी येत नाही. काहींना तर वॉल कळतच नाही. प्लंबरला कुठे वॉल आहे हे सुध्दा माहित नाही. लाईटचा बॉक्स आहे. चेंबर्सचा अडथळा आहे का पाहिले पाहिजे. नेमके कुठे वॉल आहे ते माहित करुन घेतले पाहिजे. किती साली काम झाले आहे याची माहिती करुन घ्यावी. वॉल शोधून वर काढला पाहिजे. बारीक वॉल आहे त्या ठिकाणी खुण करुन ठेवावी.

ज्या ठिकाणी दलदल, ओलसर भाग आहे त्या ठिकाणी औषध फवारणी करणे. नदीचे पाणी सगळीकडे साचल्यामुळे ओलसर भागात घाणीचे साम्राज्य झाले आहे. तेथे पावडर टाकली पाहिजे. काही ठिकाणी झाडे वाढली आहेत. काही ठिकाणी थोडेसे पाणी आले की, झोपडी बुडते. खाजगी मार्ग आहे त्यांना नोटीस दयावी. सांगवीमध्ये झोपडपट्टी दिसली नाही पाहिजे. झोपडया दिसणार नाही याची खबरदारी घ्याल का नाही.

स्वच्छता अभि यान प्रत्येक प्रभागात राबविले जाते. परंतू ब-याच ठिकाणी शौचालय घाण असतात. हे कोणी सहन करणार नाही. पुणे महापालिकेत कुत्र्याने घाण केली तर दंड करीत आहे. प्रत्येक ठिकाणचे चेंबर्स खराब झाले आहेत. गंगानगरमधील तक्रार आहे. नियमित गढूळ पाणी येत आहे. काही ठिकाणी २४x७ कनेक्शनचे काम केले आहे तरी पाणी गढूळ येत आहे. ड्रेनेजमध्ये नळकनेक्शन गेले आहेत. त्यामुळे पाईपलाईनमधून घाण पाणी येत आहे. प्रत्येक नागरीकांनी स्वत:चे नळकनेक्शन चेक करावे. अशा प्रकारची जी कामे केली आहे. त्यांना नळकनेक्शन कोणी दिले आहे ते शोधावे. या सर्व आपल्याला का सांभाळाव्या लागतात?

**मा.संजय कणसे – नामनिर्देशित सदस्य-** ब-याच वेळा मिटींगमध्ये चर्चा करुनही प्रत्येक अधिकारी मिटींगला येत नाही. दापोडी मधील दवाखान्याचा मोठा प्रश्न आहे. तेथे दवाखान्यात औषधे उपलब्ध नाहीत. पेशंटला ३० ते ४० टक्के औषधे देतात व बाकी औषधे बाहेरुन आणायला सांगतात. नागरीकांना त्या दवाखान्याचा काहीच फायदा नाही. दापोडी स्लम एरिया आहे. त्यामुळे नागरीकांना दवाखान्याचा उपयोग झाला पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे –** पशुवैद्यकिय अधिकारी यांनी मिटींगला आले पाहिजे. त्यांना पत्र दयावे.

**मा.आशा शेंडगे –** ATM कार्डवर आरोग्य विभागाकडे कामकाज करणा-या महिला आरोग्य विभागाकडे घ्याव्यात. विवरणपत्र दिलेले आहे त्याबाबत सुधारणा झाली पाहिजे. कर्मचा-यांची पिळवणूक होते. ठेकेदाराने थम्ब करावयाचे नाही. कर्मचा-यांच्या खात्यावर पैसे जमा करायचे. रेकॉर्डवर स्पष्टता नाही. याबाबत विचार केला पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे –** टॉयलेट साफ करणारे कर्मचारी येत नाही. साफ सफाई करणारे कर्मचारी कमी आहेत. कामाचा दर्जा चांगला पाहिजे. आपण चांगले काम करु शकतो. कॉन्ट्रॅक्टर यांनी काम कसे चांगले होईल हे पाहिले पाहिजे.

**मा.सभापती –** माईंनी जे विषय मांडले आहे. त्या सर्व गोष्टी सुधारण्यासाठी कार्यवाही केली पाहिजे. स्थानिक लेवलला आम्ही कामे करीत आहोत. परंतू बाकी सर्व कामे करुन घ्यावीत. सर्व अधिका-यांनी लवकरात लवकर कामे पुर्ण करुन रिपोर्ट देण्यात यावा. जे अधिकारी काम करीत नाही त्यांची बदली करण्यात यावी. पाणी, लाईटचे काम का होत नाही. प्रत्येक वॉर्डमधील नागरीक नगरसेवकांना विचारणा करीत असतात. पाच दिवसात सर्व अधिकारी नगरसेवकांना भेटले पाहिजे.

**मा.आशा शेंडगे –** झाडे लावण्यात आली परंतू नगरसेवकांना त्याबाबत खबर नाही.

**मा.सभापती** – चारही प्रभागातील नगरसेवकांना विचारल्या शिवाय कोणतेही काम करु नये.

**मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर** – झाडे लावण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी कोणतेही अधिकारी उपस्थित नव्हते. महापालिकेचे सोबत कोणी नव्हते. महाराष्ट्र शासनाचा कार्यक्रम होता.

**मा.आशा शेंडगे** – महापालिकेच्या जागेत झाडे लावली व स्थानिक नगरसेवकांना सांगितले नाही. वॉर्डमधील नगरसेवकांना बोलावले पाहिजे. प्रभागाचे स्थानिक नगसेवक असले पाहिजे.

**मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर** – रेल्वेलाईनवर छोटी छोटी झाडे लावली होती. महापालिकेने खड्डे खणून घेतले होते. पालिकेच्या जागेत झाडे लावली नव्हती. महाराष्ट्र शासनाचा कार्यक्रम होता.

**मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे** – पुढच्या वेळेस असा कार्यक्रम असेल तर स्थानिक नगरसेवकांना सांगावे. ज्यांचे हद्दीत काम करायचे त्यांना विश्वासात घेणे ही पध्दत आहे.

**मा.सभापती** – झाडे लावणे हा विषय आपला आहे. सर्व नगरसेवकांनी आपण आपल्या पध्दतीने ठरवायचे आहे.

**मा.सभापती** – मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी सर्वच मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व मिटींग संपली असे जाहिर करतो.

सही/-
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

जा.क्र.हक्षेका/कावि/१०५/२०१९
दिनांक – २३/१०/२०१९

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
" ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी – ३४.

प्रत – सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.